# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.01.2025** **वारःशुक्रवार**

---

1. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यामध्ये जगभरातल्या भारतीय समुदायाचं महत्त्वपूर्ण योगदान असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांची गतिमान उभारणी करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
3. जगातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती सुरू करण्याचा राज्य सरकारचा मानस आणि
4. राज्यातील 9 सागरी किनाऱ्यांवर ड्रोन देखरेख प्रणालीचा प्रारंभ

**<u>पंतप्रधान</u>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यामध्ये जगभरातल्या भारतीय समुदायाचं महत्त्वपूर्ण योगदान असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. जगभरात राहणाऱ्या भारतीय समुदायाच्या उत्तम कामगिरीचा देशाला अभिमान आहे असे गौरवोद्गार मोदी यांनी काढले. प्रवासी भारतीय एक्स्प्रेसला त्यांनी दूरस्थ माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला. केंद्रीय मंत्री डॉ एस जयशंकर, अश्विनी वैष्णव, यांच्यासह अनेक मान्यवर आणि विविध देशांमध्ये राहणारे प्रवासी भारतीय या संमेलनाला उपस्थित आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आज संमेलनाचा समारोप होणार असून त्यांच्या हस्ते प्रवासी भारतीय सन्मानही प्रदान करण्यात येतील.

**<u>मुख्यमंत्री</u>**

राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांची गतिमान उभारणी करा; वाढवण ते नाशिक हायस्पीड कनेक्टिविटी तयार करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत दिले. राज्यातील महत्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा काल मुख्यमंत्र्यांनी एका उच्चस्तरीय बैठकीत घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यभरातील मेट्रो, रेल्वे, महामार्ग, विमानतळ, बंदरे, सिंचन, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पर्यटन यांसारख्या विविध क्षेत्रांतील 19 महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा काल घेण्यात आला. यात पुणे रिंग रोड आणि पुणे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याचाही समावेश होता.

**<u>रावल</u>**

जगातील पहिल्या तीन मोठ्या बाजार समित्यांच्या अभ्यास करून जगातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबईजवळ सुरू करण्याचा राज्य सरकारचा संकल्प आहे अशी माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी काल पुण्यात दिली. गणेश कला क्रिडा मंच इथं आयोजित तृणधान्य महोत्सवाचं उद्घाटन रावल यांच्या हस्ते झालं; त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सोयाबीन खरेदीनंतर सात ते दहा दिवसात शेतक-यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याच्या; तसंच याबाबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी 48 तासात मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांनी पिकवलेल्या तृणधान्याला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पणन विभागाची आहे असं प्रतिपादन रावल यांनी तृणधान्य महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात केलं. तृणधान्य जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या दुचाकी फेरीलाही त्यांनी हिरवा झेंडा दाखवला. हा महोत्सव 12 जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

**<u>महोत्सव</u>**

पुणे जिल्ह्यातील नारायणगाव इथं ग्लोबल कृषी महोत्सवाचं उद्घाटन काल कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते झालं. शेतकऱ्यांचं जीवनमान सुकर करण्याबरोबरच कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याचा मानस असल्याचं कोकाटे यावेळी म्हणाले.

**ड्रोन देखरेख-रत्नागिरी**

राज्यात सागरी क्षेत्रात होणारी अवैध मासेमारी, घुसखोरी रोखण्यासाठी 'ड्रोन देखरेख प्रणाली'चं उद्घाटन मत्स्यव्यवसाय आणि बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते काल मुंबईत झालं. या प्रणालीमुळे सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होणार आहे. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**रत्नागिरीत भाट्ये आणि मिरकरवाडा, पालघरमध्ये शिरगाव, ठाण्यात उत्तन, मुंबई उपनगरात गोराई, मुंबई शहरात ससून गोदी, रायगडात वर्सोली आणि श्रीवर्धन, तसंच सिंधुदुर्गात देवगड अशा नऊ ठिकाणी ड्रोनद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे. अवैध मासेमारी रोखण्यासाठी गस्ती नौका कार्यरत असतात; मात्र त्याद्वारे होणाऱ्या तपासणीला मर्यादा आहेत. ड्रोनच्या वापरामुळे कायद्याच्या कठोर अंमलबजावणीला मदत होईल. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळी अधिक क्षेत्र देखरेखीखाली येईल. मासेमारी नौकांच्या मॅपिंगमुळे अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती सहज उपलब्ध होईल. सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून ड्रोन वापरले जाणार आहेत. 24 तासांमध्ये 120 सागरी मैल क्षेत्राचं सर्वेक्षण होईल. एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणं बंधनकारक असेल. ड्रोनने मिळवलेली माहिती संबंधित जिल्हा कार्यालयात उपलब्ध होईल. तसंच हे सर्वेक्षण कंट्रोल रूमला वेब स्ट्रीमिंगद्वारे उपलब्ध होईल. कायद्याचं कोणत्याही प्रकारचं उल्लंघन ओळखून त्यावर कारवाई करणं यामुळे सोपं होणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**सागर महोत्सव-रत्नागिरी**

रत्नागिरीतल्या शिरगाव इथल्या मत्स्य महाविद्यालयात आयोजित सागर महोत्सवाचं उद्घाटन काल जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. के. कथिरेसन यांच्या उपस्थितीत झालं. जवळपास 93 टक्के कार्बन डाय ऑक्साईड समुद्रात शोषून घेतला जातो. पृथ्वीवरच्या 93 टक्के उष्णतेचं नियंत्रणही समुद्रातच केलं जातं. समुद्रावरंच मनुष्यजीवन अवलंबून आहे. त्यामुळे त्याचं संवर्धन करण्याची आवश्यकता आहे, असं प्रतिपादन कथिरेसन यांनी यावेळी केलं.

**लष्करदिन**

भारतीय लष्कराच्या 77व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्याच्या बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होणाऱ्या संचलनात लष्करातील महिला शक्तीचं दर्शन होणार आहे. सध्या या संचलनाचा सराव सुरू आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून...

**पुण्यात पहिल्यांदाच होत असलेलं लष्कर दिनाचं संचलन भारतीय लष्कराचं सामर्थ्य, अत्याधुनिक शस्त्र सामग्री तसंच भारतीय नागरिकांशी असलेलं दृढ नातं दर्शवणारं आहे. या संचलनात पहिल्यांदाच नेपाळ लष्करी बँडचा समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर लष्कर पोलिसांचं महिला अग्निवीर दल, राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसीच्या महिला दलाचा यात समावेश आहे. या दोन महिला दलांचा संचलनात सहभाग ही अभिमानाची बाब आहे. त्याचबरोबर बेळगावचं मराठा रेजिमेंट दल, नाशिकचं तोफखाना दल, नाशिक, अहिल्यानगर आणि सिकंदराबादच्या तोफखाना केंद्राचं दल, आणि लष्कराच्या घोडदलाचाही यामध्ये सहभाग आहे. भारतीय लष्करातील टी 90 रणगाडा, वज्र यंत्रणा, सारथी चिलखती वाहन यांचाही सहभाग आहे. भारतीय लष्करातील अद्ययावत उपकरणं लष्कराची आत्मनिर्भरता दर्शवतात. तसंच लष्कराची ऑलिम्पिक मोहीम, विकसित भारत 2047 मोहीम, देशाच्या उभारणीत माजी सैनिकांचा सहभाग, हवामान बदल आणि प्रदूषण मुक्तीसाठी लष्कराचे प्रयत्न हे दर्शवणारे चित्ररथही संचलनाचं आकार्षण असणार आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी श्रद्धा वार्डे, पुणे.**

**पुरस्कार**

पुण्यातील गिरीप्रेमी संस्थेचे ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना 2023 चा, मानाचा तेनजिंग नॉर्गे राष्ट्रीय साहस जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 17 जानेवारीला दिल्लीमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. साहसी क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर उमेश झिरपे यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.......

**सफाई-अहिल्यानगर**

स्वच्छता कामगारांचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबरोबरच आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा, सुरक्षा साधने आणि कामकाजासाठी सयंत्राचा पुरवठा करण्याचे निर्देश राष्ट्रीय स्वच्छता कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी. वावा यांनी दिले. स्वच्छता

कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत अहिल्यानगरमध्ये झालेल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. आपल्या हक्कापासून स्वच्छता कामगार वंचित राहणार नाही याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही डॉ. वावा यांनी दिल्या.

**केसगळती-बुलडाणा**

बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यात पूर्णा नदीकाठच्या विविध गावांमध्ये नागरिकांच्या डोक्यावरील केस गळतीचं प्रमाण अचानक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने आरोग्य विभागानं त्वचारोग तज्ज्ञांच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू केलं आहे. यासंदर्भात आरोग्य विभागाने तपासणी केली असता, या गावातील कूपनलिका आणि विहिरीचं पाणी पिण्यासाठी आणि वापरण्यासाठी अयोग्य असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यानुसार संबंधित गावांतील पाणी पिण्यासाठी किंवा अन्य कारणांसाठी वापरू नये, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नागरिकांना केलं आहे.

**वनमंत्री गणेशनाईक**

वनक्षेत्राचा विकास आणि वन्य प्राण्यांच्या संरक्षणाला राज्य सरकारचं प्राधान्य असल्याचं राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी म्हटलं आहे. ते काल नागपुरात माध्यमांशी बोलत होते. राज्यात वन विभागाअंतर्गत कर्मचारी आणि काही यांत्रिक सामग्रीची कमतरता असल्याचं मान्य करत, याबाबत आढावा घेऊन आगामी अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद केली जाईल असं त्यांनी सांगितलं.

**परदेशी पक्षी-गोंदिया**

हिवाळ्याची चाहूल लागल्यानंतर गोंदिया जिल्ह्यातील तलावांवर परदेशी पक्ष्यांचं आगमन व्हायला सुरवात झाली आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्याच्या सिरेगाव बांध, नवेगाव बांध, बुटाई, श्रृंगार बांध, अशा विविध तलावांवर ग्रे लॅग गुज, पिनटेल युरेशियन विजन, गडवाल गार्गनी, कॉमन पोचार्ड, रेड क्रेस्टेड पोचार्ड विसलींग डक हे स्थलांतरित पक्षी दिसू लागले आहेत. सायबेरिया, मंगोलिया, आणि युरोपियन देशांतून येणारे हे पक्षी सध्या पक्षी मित्र आणि अभ्यासकांचं लक्ष वेधून घेत आहेत.

**क्रीडा**

नवी दिल्लीमध्ये येत्या 13 ते 19 जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातील पाच तर महिला संघात राज्यातील तीन खो-खोपटूंची निवड झाली आहे. पुरुष आणि महिला गटाचे कर्णधारपद पुण्यातील खेळाडूंना मिळालं आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळेची नियुक्ती करण्यात आली आहे. पुरूष संघाच्या प्रशिक्षकपदी शिरीन गोडबोले आणि महिलांच्या प्रशिक्षकपदी प्राची वाईकर यांची निवड झाली आहे.

**हवामान**

विदर्भ मराठवाड्यासह राज्याच्या काही भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत घट झाली आहे. येत्या 24 तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे, इतरत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.